# मिरा भाईंदर महानगरपालिका

उद्यान विभाग

## प्रेस नोट

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्यानांमध्ये "SUNDAY GARDEN" उपक्रम राबविणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्यानांमध्ये SUNDAY GARDEN उपक्रम राबविण्यात येत असुन महानगरपालिका क्षेत्रातील 1) सालासर उद्यान, भाईंदर (प.) 2) जेसलपार्क चौपाटी, भाईंदर (पुर्व) 3) सावित्रीबाई फुले उद्यान (आरक्षण क्र.269), कनकिया ही 03 उद्याने दि.03/12/2023 ते दि.28/02/2024 या कालावधीत प्रत्येक रविवारी संपुर्ण दिवस खुली असणार आहेत.

या उपक्रमाचे उद्घाटन सावित्रीबाई फुले उद्यान (आरक्षण क्र. 269) कनकिया येथे रविवार दि.03 डिसेंबर 2023 रोजी 5.00 वाजता मा. आयुक्त तथा प्रशासक श्री.संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से) यांच्या हस्ते संपन्न झाले. सदर प्रसंगी अतिरीक्त आयुक्त (1) श्री. अनिकेत मानोरकर, उप.आयुक्त (मु.) श्री. मारुती गायकवाड, उप.आयुक्त (उद्यान) श्रीम. कल्पिता पिंपळे व इतर सर्व अधिकारी/ कर्मचारी उपस्थित होते.

सदर उपक्रमाची प्रस्तावना उप आयुक्त (उद्यान) श्रीम. कल्पिता पिंपळे यांनी केली. मा. आयुक्त तथा प्रशासक श्री. संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से) यांनी उपस्थित नागरिंकाना संबोधित करुन "SUNDAY GARDEN" उपक्रम राबविण्याचा उद्देश थोडक्यात सांगितला. सदर 03 उद्यानांमध्ये दि.03/12/2023 ते दि.28/02/2024 या कालावधीमध्ये प्रत्येक रविवारी संध्याकाळी 5 ते 8 या वेळेत नागरीकांसाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. सदर ठिकाणी नागरीकांसाठी गाण्यासाठी तसेच नृत्य, मिमिक्री यासारख्या विविध कलांचे सादरीकरण करणेसाठी प्लॅटफॉर्म उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

दि.03/12/2023 रोजी उद्घाटनदिनी 269 गार्डन या ठिकाणी नागरीकांनी गाणी गायली. तसेच पर्यावरण विभागामार्फत पथनाट्य सादर करण्यात आले. बाल जादुगर कु. स्वरांग याने जादुचे प्रयोग सादर केले. तसेच जेसल पार्क चौपाटी व सालासार उद्यान येथे देखील नागरीकांनी गाणी गाऊन मोठ्या संख्येने सदर उपक्रमात भाग घेतला. अश्या प्रकारे SUNDAY GARDEN हा उपक्रम साजरा करण्यात आला सदर उपक्रमास नागरिकांचा उत्सुर्फ़ प्रतिसाद मिळाला. तरी दि.03/12/2023 ते दि.28/02/2024 या कालावधीतील महिन्याच्या प्रत्येक रविवारी नागरीकांनी सदर उपक्रमात असाच मोठ्या संख्येने सहभाग घेऊन SUNDAY GARDEN हा उपक्रम यशस्वी करावा, असे आवाहन आयुक्त महोदयांनी केले.

(कल्पिता पिंपळे)
उप-आयुक्त (उद्यान)
**मिरा भाईंदर महानगरपालिका**